दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १११ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१५ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## अनियंत्रित बस झाडावर धडकली; चालकासह १२ प्रवासी जखमी

**नागपूर : वृत्तसंस्था**

नागपूर-भंडारा राष्ट्रीय महामार्गावर सावळी बस स्टॉप नजीक हल्दीराम कंपनी समोर अनियंत्रित बस रस्त्याच्या कडलेल्या असलेल्या झाडावर धडकली. यात अपघातात एसटी चालकासह १० ते १२ प्रवासी जखमी झाले आहेत. बुधवारी ३.४५ वाजजा दरम्यान हा अपघात झाला. सर्व जखमींनी भंडारा येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार नागपूर-भंडारा-साकोलीला जाणारी एसटी बस क्रमांक एम.एच.४०-एन ९५६७ नागपूर येथून भंडाजयाकडे जात असताना नागपूर-भंडारा राष्ट्रीय महामार्गावर सावळी बस स्टॉप (हल्दीराम कंपनी) समोर चालकाचा स्टेअरींगवरील ताबा सुटल्याने बस रस्त्याच्या कडलेला असलेल्या मोठ्या झाडावर धडकली. यात चालकासह १० ते १२ प्रवासी जखमी झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या मदतीने सर्व जखमींना भंडारा येथील जिल्हा रुग्णालय उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# मालमत्ता करा विरोधात महाविकास आघाडीचा मोर्चा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**कामोठे वसाहतीमध्ये सर्वसामान्य जनतेने रस्त्यावर उतरून मूक मोर्चा काढत बोलका विरोध मागील आठवड्यामध्ये दर्शविला होता. मालमत्ता करा विरोधात महाविकासआघाडीने सुद्धा कंबर कसली आहे. बुधवारी कळंबोली वसाहतीत मोर्चा काढून अन्यायकारक कर न भरण्याचे आवाहन रहिवाशांना करण्यात आले. महापालिका प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी विरोधात यावेळी निदर्शने करण्यात आले.**




पनवेल महानगरपालिकेने एकूण पाच वर्षाचा मालमत्ता कर एकदम घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मालमत्ताधारकांना प्रशासनाकडून देयके पाठवण्यात आली आहेत. वास्तविक पाहता ही रक्कम मोठी असल्याने सर्वसामान्य नागरिक हवालदिल झाले आहेत. सिडकोला सेवा शुल्क भरल्यानंतर ही पनवेल महापालिकेला पाच वर्षाचा कर भरायचा कसा असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. महापालिका प्रशासन कर लागू करून तो वसूल करण्याच्या मुद्यावर ठाम आहे. पुन्हा पदभार घेतलेले मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनीही या कर रचनेचे समर्थन केले आहे. मालमत्ताधारकांना हा कर भरावाच लागेल अशी भूमिका त्यांनी सुद्धा घेतलेली आहे. मालमत्ता भाडे मुल्याबरोबर पालिका प्रशासनाने पाणी, मलनिस्सारण, शिक्षण आणि अग्निशमन सेवा मूल्य आपल्या रचनेमध्ये समाविष्ट केले आहे. यापैकी एकही सेवा महापालिकेने दिलेली नसताना त्यांना हे पैसे भरायचे कसे असा प्रश्न सिडको वसाहतीतील रहिवाशांनी विचारला आहे.

> पनवेल महानगरपालिकेने सर्वसामान्यांवर हा जिझिया कर लादला आहे. त्याला महा विकास आघाडीच्या वतीने विरोध करण्यात आला आहे. याविरोधात आपल्या नगरसेवकांनी महासभेमध्ये आवाज उठवला होता. त्यांच्यावर निलंबनाची कारवाई सत्ताधारी पक्षाने सूडबुद्धीने केली. बहुमताच्या जोरावर मालमत्ता कराचा ठराव भारतीय जनता पक्षाने महापालिकांमध्ये संमत केला. पनवेल करांवर अन्यायकारक असा हा कर लादण्यात आला आहे. याविरोधात आमचे हे आंदोलन सुरू आहे.
>
> **बाळाराम पाटील, शिक्षक आमदार**

दरम्यान या विरोधात बुधवारी महाविकासआघाडी च्या वतीने कळंबोलीत मूक मोर्चा काढण्यात आला. भरणार नाही भरणार नाही मालमत्ता कर भरणार नाही, सेवा नाही तर कर ही नाही अशा प्रकारचे संदेश देणारे फलक घेऊन मोर्चेकरी सहभागी झाले होते. पाच वर्षे कोणताही कर घेऊ नये, सिडको सेवा कर घेत असल्याने महापालिकेने दुहेरीकरण लादू नये, ड वर्ग महापालिके प्रमाणे पनवेल ची कर रचना सुटसुटीत करण्यात यावी, कोरोना संकटामध्ये हा कर सर्वसामान्यांच्या मानगुटीवर लादण्यात येऊ नये अशा प्रकारची मागणी महा विकास आघाडीच्या वतीने करण्यात आली. या मूक मोर्चा मध्ये शिक्षक आमदार बाळाराम पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, शिवसेना महानगरप्रमुख रामदास शेवाळे, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुदाम पाटील, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, नगरसेवक रवींद्र भगत, गोपाळ भगत, नगरसेविका प्रिया विजय भोईर, प्रज्योती म्हात्रे, कमल कदम, सरस्वती काथारा, वंदना बामणे, शिवसेनेचे पनवेल विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, शहरप्रमुख डी एन मिश्रा, आत्माराम गावंड, कृष्णकांत कदम, सुभाष गायकवाड, सूर्यकांत म्हसकर, अरविंद कडव, महेंद्र पवार, प्रकाश चांदिवडे, गिरीश धुमाळ यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> गेल्या पाच वर्षाचा कर पनवेलकरांवर लादण्यात आला आहे. याकरता जनभावना विचारात घेण्यात आलेल्या नाहीत. इतक्या मोठ्या कराच्या रकमा आणि त्याही कोरोना संकटामध्ये पाठवण्यात आलेल्या आहेत. एकीकडे महागाईचा भस्मासुर इंधन वाढीमुळे झालेला असताना दुसरीकडे पनवेल महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनी पनवेलकरांच्या माथी दुहेरी कर लादला आहे. याविरोधात महाविकास आघाडीच्या वतीने या पुढेही लढा सुरूच राहील.
>
> **रामदास शेवाळे, पनवेल महानगर प्रमुख शिवसेना**

> पाच वर्षे कोणताही कर न घेण्याचे आश्वासन सत्ताधाऱ्यांनी आपल्या वचन नाम्या मध्ये दिले होते. परंतु झाले काय पाच वर्षाचा एकदम कर सिडको वसाहतीतील रहिवाशांना भरण्याचा घाट प्रशासनाने घा-तला आहे. वास्तविक पाहता ड वर्ग महानगर पालिकेच्या दृष्टिकोणातून कराची ही रक्कम मोठी आहे. हा अन्यायकारक जिझिया कर रद्द झाला पाहिजे ही आमची प्रामुख्याने मागणी आहे. महाविकास आघाडी एकजुटीने सर्वसामान्य जनतेच्या पाठीमागे उभी आहे.
>
> **सुदाम पाटील, कार्याध्यक्ष पनवेल शहर जिल्हा काँग्रेस**

## संक्षिप्त...

### तळकोकणात १५ ते १८ जुलैला अतिमुसळधार पाऊस इशारा

**सिंधुदुर्ग : वृत्तसंस्था**

तळकोकणाला आज दिवसभर मुसळधार पावसाने झोडपले असून जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. जिल्ह्यातील निर्मला नदीला पूर आल्याने कुडाळ तालुक्यातील माणगाव खोऱ्यातील २७ गावांचा संपर्क तुटला आहे. तर कुडाळ तालुक्यातील वेताळ बाबर्डे येथे पुराच्या पाण्याने दोन घरांना वेढा घातला आहे. तेरेखोल नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने पुराचे पाणी बांदा आळवाडी-मच्छीमार्केट बाजारपेठेत घुसले तर बांद्यातील निमजगा रस्ता पाण्याखाली गेला. बांद्यातील बाजारपेठतील दुकानांमध्ये पाणी घुसले. दोडामार्ग मधील घोडगे परमे पूल पाण्याखाली गेलाय. त्यामुळे तिलारी नदीकाठच्या नागरिकांना प्रशासनाने सतर्कता इशारा दिला आहे.

प्रादेशिक हवामान विभाग मुंबई यांच्याकडून दिलेल्या माहितीनुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यात १५ ते १८ जुलैला मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शुभांगी साठे यांनी केले आहे. संगणक, टीव्ही इत्यादी विद्युत उपकरणे बंद ठेवून स्त्रोतांपासून अलग करून ठेवावीत. दूरध्वनी, भ्रमणध्वनीचा वापर टाळावा. नागरिकांनी घराबाहेर पडू नये. घराबाहेर असल्यास सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. विजेच्या खांबांपासून लांब रह-ावे. उंच झाडाखाली आश्रयास थांबू नये. एखाद्या मोकळ्या परिसरात असल्यास, गुडघ्यामध्ये डोके घा-लून वाकून बसावे. धातूच्या वस्तू दूर ठेवाव्यात. सततच्या पडणाऱ्या मुसळधार पावसात पुढीलप्रमाणे दक्षता घ्यावी. आवश्यकता नसल्यास घराबाहेर पडणे टाळा.

अतिमुसळधार व अतिवृष्टीच्या परिस्थितीत कोणत्याही परिस्थितीत सुरक्षित ठिकाणी रहा व पायी अथवा वाहनाने प्रवास करु नका. घरा बाहेर पडणे अत्यावश्यक असल्यास निघण्यापूर्वी अधिकृत स्त्रोतांकडून हवामानाची, रेल्वेची व रस्ते वाहतुकीची आणि पाणी तुंबलेल्या ठिकाणांची माहिती करुन घ्या. पाऊस पडत असताना विजा चमकत असल्यास झाडाखाली उभे राहू नये.

## अनधिकृत बांधकामे सहज कळावी यासाठी ‘स्मार्ट वॉच’ यंत्रणा राबवणार

### अनधिकृत झोपड्या, अनधिकृत बॅनर, होर्डिंग, रस्त्यांवरील फळविक्रते, फूटपाथवरील विक्रेते यांच्या विरोधात सक्त कारवाई करण्याचे आदेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल महापालिकेच्या आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आयुक्त गणेश देशमुख यांनी जोरदार कामांचा सपाटा लावला आहे. नागरी समस्या, प्रलंबित प्रकल्प, लसीकरण तसेच संभाव्य कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत सक्षमीकरण करण्यासाठी गणेश देशमुख कटिबद्ध असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रभाग कार्यालय सक्षम झाल्यास़ तेथील नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविल्या जातील, त्यांना चांगल्या सोयी सुविधा देता येतील. यासाठी येत्या तीन वर्षात प्रशस्त प्रभाग समिती कार्यालये बांधण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना अधिकारी आणि प्रभाग अधिकारी यांच्या झालेल्या बैठकीत आयुक्त गणेश देशमुख यांनी नुकत्याच दिल्या.

प्रभाग कार्यालये ही लहान नगरपालिकाच असते, प्रत्येक कामासाठी नागरिकांना मुख्यालयात न येता त्यांची कामे प्रभाग कार्यालयातच व्हावी यासाठी प्रभाग कार्यालये सुसज्ज हवी. सर्व सोयी- सुविधांनीयुक्त अशी प्रभाग कार्यालये बांधण्याच्या दृष्टीने त्यांचा आराखडा तयार करण्याच्या सूचना यावेळी आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

याचबरोबर अतिक्रमणाविरोधात येथून पुढे कठोर पावले उचलली जाणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. अनधिकृत झोपड्या ,अनधिकृत बॅनर, होर्डिंग, रस्त्यांवरील फळविक्रते, फूटपाथवरील विक्रेते यांच्या विरोधात सक्त कारवाई करण्याचे आदेश प्रभाग अधिकाऱ्यांना दिले.

पनवेल पालिका स्थापन झाल्यापासून जी अनधिकृत बांधकामे आणि अनधिकृत झोपड्या बांधल्या गेल्या आहेत त्यांच्या विरोधात कारवाई करण्याचे नियोजन लवकरात लवकर करावे असे आदेश यावेळी आयुक्तांनी प्रभाग अधिकाऱ्यांना दिले.

पनवेल कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये अनधिकृत बांधकामे सहज कळावी यासाठी ‘स्मार्ट वॉच’ यंत्रणा राबविण्यात येणार आहे. याचे प्रात्यक्षिक या बैठकित .../२

## एका दिवसाच्या पावसाने उडवला उरण नगरपालिकेच्या नालेसफाईचा फज्जा

### अनेकांच्या घरात घुसले पाणी

**दै.रायगड नगरी । उरण**

काल रात्रीपासून पडणाऱ्या पावसामुळे व शहरातील नालेसफाई व्यवस्थित न झाल्याने अनेकांच्या घरांना पाणी घुसून समानांचे नुकसान झाले आहे.

काल दुपारपासून पावस-ाने जोर धरला होता. त्यात रात्रभर पाऊस जोराने पडत असल्याकारणाने व नाले जाम झाल्याने शहरातील इमारतीमधील पहिल्या मजल्यात व बैठ्या घरात पाणी घुसण्यास मध्यरात्री सुरुवात झाली. त्यामुळे काहींना मध्यरात्रीपासूनच रात्र जागून काढण्याची वेळ आली. घरांना पाणी घुसल्याने घरातील समानांचे नुकसान झाले असल्याचे छायाचित्रावरून दिसून येते. एक दिवसाचा पावसाने हे हाल होत असतील तर पावसाळा जाईपर्यंत एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. .../२





## पाली- खोपोली मार्गावर अवजड वाहतूक ; कमकुवत पुलांना धोका

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

वाकण- पाली -खोपोली मार्गावरील येथील १९५० आली बांधण्यात आले आहे. या पुलाला सुमारे ७१ वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या आलेल्या पुलावर वाहनाचे कायम ये जाअसते मात्र ७१ वर्षापूर्वी वाहन संख्येच्या तुलनेत आत्ताच्या वाहनांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे एखाद्या अवजड वाहन या पुलावरून जात असल्या धोका वाढतो.



पाली खोपोली मार्ग जुना अंबानदी वरील पाली जांभुळपाडा हे दोन्ही पूल कमकुवत झाले. असून या कमकुवत पुलावरून अवजड वाहनांची राजरोसपणे वाहतूक होत आहे. अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे या कमकुवत पुलाना धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे भविष्यात महाड येथील सावित्री नदी व काशिद सारखी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मार्गावरून संबंधित अधिकाऱ्यांना ओव्हरलोड वाहतूक बंद करण्यात जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश केले असतानाही. दुपारी तसेच रात्रीच्या वेळेस आजारपणे अवजड वाहने धावत आहेत. या बाबत उपप्रादेशिक परिवहन विभागाला या बाबत पत्रव्यवहारही करण्यात आले असल्याचे समजते. असे असताना पाली खोपोली मार्गावर होणारा कोळसा, .../२

## पनवेल महापालिकेने केली ५ दुकाने व १३ हॉटेल्सवर कारवाई

### नियमांचे उल्लघंन करणाऱ्या दुकाने, हॉटेल्सवर महापालिकेची करडी नजर


**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाची दुसरी लाट ओसरत असताना सर्वत्र लॉकडाऊनचे नियम शिथिल करताना हॉटेल्स सोमवार ते शुक्रवार दुपारी चार पर्यंत ५० टक्के क्षमतेने सुरू ठेवावीत, दुपारी ४ नंतर पार्सल सेवा सुरू ठेवावी. अत्यावश्यक सेवेशिवाय इतर दुकाने दुपारी चार पर्यंत सुरु ठेवावीत,असे आदेश शासनाने दिले आहेत. असे असताना देखील पनवेल कार्यक्षेत्रातील खारघर, पनवेल, कामोठे, कळंबोली, तळोजा, नवीन पनवेल अशा सर्व नोडमध्ये काही हॉटेल्स, दुकाने रात्री उशीरापर्यंत सुरू ठेवली जात आहेत. पालिकेने लॉकडाऊनचे नियम पाळण्याविषयीच्या सूचना वारंवार देऊनही काही हॉटेल व्यवसायिक, दुकानदार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे प्रशासनाच्या निर्दशनास आल्याने मंगळवारी रात्री (दि.१३ जुलै) अधिकारी आणि प्रभाग अधिकारी यांनी एकुण ५ दुकाने व १३ हॉटेल्सवर कारवाई केली.

नुकत्याच झालेल्या एका बैठकित प्रभाग अधिकाऱ्यांना आयुक्त गणेश देशमुख यांनी नियमानुसार दिलेल्या वेळेपेक्षा अधिक काळ सुरू असणारी दुकाने व हॉटेल्सवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार खारघर येथील कोपरा हायवे ब्रेक हॉटेल, शिवव्हेज हॉटेल, कळंबोली येथील ओसिस, हॉटेल गाजेबो,पनवेल मधील सॉल्ट -न- पेपर, हॉटेल आमंत्रण, वामन अमृततुल्य, हॉटेल दिपा, हॉटेल जय मल्हार, हॉटेल महालक्ष्मी, कामोठे येथील तवा हॉटेल, मानसरोवर हॉटेल, चायना सिटी यांच्यावर कारवाई करण्यात आली.

कोरोनाचा प्रादुर्भाव पूर्णपणे रोखण्यासाठी लॉकडाऊनच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले असून अत्यावश्यक सेवेशिवाय इतर दुकांने दुपारी चार नंतर सुरु असल्याचे निर्दशनास आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी अधिकारी व प्रभाग अधिकारी यांना दिले आहे. तसेच हॉटेल्सनी देखील दिलेले नियम पाळावे अशा सूचना केल्या आहेत.



## विठूमाऊली भक्तांसाठी भजनाचा आस्वाद आणि आरतीचे थेट प्रक्षेपण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आषाढी एकादशीनिमित्त २० जुलै रोजी ’अवघे गर्जे पंढरपूर’ या धार्मिक कार्यक्रमाचा थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून भक्तगणांना लाभ घेता येणार आहे.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये म्हणजे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक पनवेल तालुका सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष पंडित उमेश चौधरी आणि तालमणी पंडित प्रतापराज पाटील प्रथमच हे दोन दिग्गज कलाकार एकत्रितपणे कार्यक्रम सादर करणार आहेत.

आषाढी एकादशी म्हणजे भगवान विठ्ठल भक्तांसाठी दीपावली सणच असतो. या दिवशी सर्व वारकरी मंडळी पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपूरात गोळा होतात. वारकरी भक्तगण या दिवसाची आतुरतेने वाट पहात असतात. अवघ्या पंढरपूरात विठूनामाचा गजर होत असतो. परंतु या वर्षीही कोरोना महामारीमुळे वारी शासनाने रद्द केली आहे. तरी सर्व भक्तमंडळींना भजन, आरती व दर्शनाचा लाभ व्हावा म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, .../२

# जुना प्रश्न; नवे उत्तर?

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जेआरडी टाटा हे पंतप्रधान पंडित नेहरूंकडे गेले आणि म्हणाले, 'लोकसंख्येच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.' तेव्हा पंडितजी म्हणाले, 'पण जे, लोकसंख्या ही आपली मोठी ताकद आहे.' जेआरडी निघून गेले. चार वर्षांनी ते पुन्हा निराश होण्याच्या तयारीने हाच मुद्दा घेऊन पंडितजींकडे गेले; तेव्हा १९५१मध्ये भारताची लोकसंख्या ३६ कोटी १० लाख होती. आज ती १४० कोटी आहे. चीनने नुकतेच लोकसंख्या धोरण सैल केले असले, तरी भारत चीनला मागे टाकणार आहेच. या पार्श्वभूमीवर, उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकार आणि आसामात वेगाने कामाला लागलेले सर्वानंद सोनोवाल सरकार, यांच्या लोकसंख्या नियंत्रणाच्या प्रस्तावित धोरण मसुद्याकडे पाहावे लागेल. ही धोरणे अद्याप विधिमंडळात आलेली नाहीत आणि ती मंजूर झाली, तरी केंद्र सरकारने लक्ष घातल्याशिवाय लगेच राबविता येतील, असे नाही. याचे कारण, उत्तर प्रदेश सरकारच्या लॉ कमिशनने तयार केलेल्या मसुद्याबाबत काही घटनात्मक प्रश्न निर्माण होऊ शकतात. महाकाय आणि देशांतर्गत प्रचंड स्थलांतर होणाऱ्या भारतात अशा विषयांचे एकच आणि समान धोरण असायला हवे. उदाहरणार्थ, दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या उत्तर प्रदेशातील जोडप्यांना काही सवलती मिळाल्या नाहीत, तरी ते कुटुंब इतर राज्यात स्थलांतरित झाल्यास काय घडेल? तसेच, या धोरणात 'मुस्लिम पर्सनल लॉ'मुळेही काही गुंतागुंत निर्माण होऊ शकते; त्यामुळे हा विषय राज्यांपुरता न ठेवता, केंद्राने पुढाकार घेऊन त्याची राष्ट्रीय पातळीवर तड लावण्याची गरज आहे. योगी व सोनोवाल या दोन्ही मुख्यमंत्र्यांनी हा विषय ऐरणीवर आणला, याबद्दल मात्र त्यांचे अभिनंदनच करायला हवे. लोकसंख्या विस्फोटाचा मुद्दा सर्व राजकीय पक्ष व नेत्यांनी १९७७ मध्ये जनता पक्षाचा ऐतिहासिक विजय झाल्यापासून सोयीच्या विस्मरण गुहेत टाकून दिला आहे. दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणलेल्या आणीबाणीत उत्तर भारतात नसबंदीची जी सक्ती झाली, तेव्हापासून या विषयाला हात लावण्याचे धाडस कोणीही करत नाही. इतकेच काय, कुटुंब नियोजन या आरोग्य खात्यातील विभागाचे नाव कुटुंब कल्याण असे करण्यात आले. त्यातच, काही वैज्ञानिकांनी भारताची लोकसंख्या एक अब्जाचा आकडा ओलांडणार की नाही, अशा स्वरूपाची शंका व्यक्त करून, अनुत्सुक धोरणकर्त्यांना जणू पाठिंबाच दिला; मात्र या प्रश्नाला जो धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न चालू आहे, त्याचा निषेध करावा तितका थोडा होईल. मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचा वेग हिंदूंपेक्षा जास्त असल्याने भारतातील लोकसंख्येचे गणित बिघडेल, अशी अशास्त्रीय भीती मुद्दाम घातली जाते. त्यात तथ्य नाही. भारतात लोकसंख्या नियंत्रणाचे प्रयत्न दक्षिणेकडील राज्यांमध्ये अधिक यशस्वी झाले आहेत. त्या तुलनेत उत्तर भारतात कमी. केरळसारख्या राज्यात हिंदू, ख्रिस्ती व मुस्लिम या तीनही धर्मांची लोकसंख्या जवळपास सारखी आहे. तेथे लोकसंख्या नियंत्रण यशस्वी झाले. याउलट, बिहार, राजस्थान, उत्तर प्रदेश या राज्यांची स्थिती पाहिली, तर तेथे सर्वच धर्मांच्या कुटुंबांत मुले असण्याचे सरासरी प्रमाण अधिक आहे. तेव्हा हा मुद्दा शिक्षण, विकास आणि आर्थिक उन्नती यांच्याशीही निगडीत असतो. योगी व सोनोवाल यांच्या पुढाकारानंतर, 'महिलांचे शिक्षण हेच यावरचे खरे व टिकाऊ उत्तर आहे,' अशी प्रतिक्रिया बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दिली. ती योग्य असली, तरी स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाल्यानंतर खुद्द बिहारमध्ये स्त्रीशिक्षणाची व त्यामुळे कुटुंब नियोजनाची स्थिती केविलवाणी आहे. लोकसंख्येच्या प्रश्नाकडे धार्मिक दृष्टीने न पाहता, केवळ राष्ट्रहिताच्या दृष्टीने पाहिले, तर सर्व जातीधर्मांच्या नागरिकांना काळजी वाटावी, असा हा मुद्दा आहे. माजी निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांनी अलीकडेच, 'द पॉप्युलेशन मिथ : इस्लाम, फॅमिली प्लॅनिंग अँड पॉलिटिक्स इन इंडिया' हा विवेचक ग्रंथ लिहिला आहे. मुस्लिमही कुटुंब नियोजन स्वीकारत असून, हिंदू व मुस्लिम दाम्पत्यांमधील सरासरी अपत्यसंख्येतील फरक झपाट्याने कमी होतो आहे, असे त्यांच्या लेखनाचे एक सूत्र आहे. या ग्रंथाच्या निमित्ताने एक निकोप राष्ट्रीय परिचर्चा झडायला हवी. उत्तर प्रदेश आणि आसाम या सरकारांच्या स्वागतार्ह पुढाकारानंतर, या प्रश्नाचे राष्ट्रीय गांभीर्य आणि पावित्र्य जपण्याची जबाबदारी आता केंद्र सरकार व भाजप नेत्यांची आहे. 'लेकुरे उदंड जाहली, ते तो लक्ष्मी निघोन गेली, बापुडी भिकेला लागली, काही खावया मिळेना' हे समर्थ रामदासांनी सांगून काही शतके लोटली; मात्र हे शहाणपण आता नव्याने उगवत असेल, तर त्याला धार्मिक रंग चढणार नाही, याची काळजी सगळ्यांनी घ्यायला हवी. तशी ती घेतली नाही, तर एका ज्वलंत राष्ट्रीय प्रश्नाचे सुमारीकरण व उथळीकरण केल्याचे पाप घडेल. तसे होता कामा नये.

## शासकीय अधिकारी वर्गाच्या डोळेझाक कारभारामुळे रस्त्यावर पाणी

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**



सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको आणि जेएनपीटी बंदराचे अधिकारी यांच्या डोळेझाक कारभारामुळे नवघर, जेएनपीटी वसाहत स्थानका वरील रस्त्या गेली चार वर्षे पाण्याखाली जात आहे. त्यामुळे उरण – नवीमुंबई परिसरात ये – जा करणाऱ्या वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

उरण, द्रोणागिरी नोड आणि जेएनपीटी बंदर परिसर यांच्या विकासाला गती देणारा उरण तालुक्यातील महत्वाचा रस्ता म्हणून आज ही उरण – पनवेल या रस्त्याकडे पाहीले जात आहे. परंतु विकासाला चालना मिळवून देण्यासाठी दर्जेदार रस्ते, मार्ग यांची उभारणी करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको आणि जेएनपीटी बंदर अधिकारी वर्गाने पारंपरिक रहदारीचा मार्गक्रमण असणाऱ्या नवघर जेएनपीटी वसाहत स्थानका जवळील रस्त्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे गेली चार वर्षे वाहतूकीच्या दुष्टीने महत्वाचा असणारा रस्ता पावसाळ्यात सतत पाण्या खाली जात आहे.

त्यामुळे या रस्त्यावरुन मार्गक्रमण करणाऱ्या वाहन चालकांना रात्री अपरात्री रस्तावर साचणाऱ्या पाण्याचा अंदाज न आल्याने वाहनांत बिघाड तसेच अपघा–तास सामोरे जावे लागत आहे.

तरी सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको आणि जेएनपीटी बंदराचे अधिकारी यांनी रस्त्यावर साचणाऱ्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे कशा प्रकारे करता येईल यासाठी ठोस उपाययोजना करावी अशी मागणी वाहन चालक करत आहेत.

## कमळ गौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेचा २४ वा वर्धापनदिन साधेपणाने साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा परिसरातील फेज १ येथे शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी मारलेल्या कमळ गौरी हिरू पाटील शिक्षण संस्थेचा २४ वा वर्धापनदिन साधेपणाने साजरा करण्यात आला.

यावेळी संस्थेचे संस्थापक, चेअरमन बबनदादा पाटिल यांचे वडील कै. कमळू हिरू पाटील यांच्या पुण्यतिथीदिनानिमित्त बाळासाहेब ठाकरे महाविद्यालय, तळोजे येथे सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तसेच ड्डइ मधे द्वितीय वर्षात प्रथम क्रमांक मिळालेल्या कुमारी रश्मी सासमल आणि द्वितीय क्रमांक मिळवलेल्या अरबाझ मोमीन यांचा सत्कार करण्यात आला, यावेळी मास्क तसेच सॅनिटायझरचे वाटप करण्यात आले.

यावेळी पार पडलेल्या कार्यक्रमात माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य सखाराम पाटील, शंकरशेठ पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख शिरिषजी घरत, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रामदासजी पाटील, राष्ट्रवादी जिल्हा अध्यक्ष सतिश पाटील, शिवसेना उपमहानगरप्रमुख कैलास पाटील, शहरप्रमुख बाळाजी मुंबईकर, माजी उपसभापती देविदास पाटील, उपशहरप्रमुख शहर महेश भोईर, विभाग संघटक खोबाजी पाटील, विधानसभा अधिकारी पराग मोहिते, विभाग अधिकारी जिवन पाटील, प्राचार्य डॉ. राजेश साखरे, प्राचर्य डॉ. राहुल कांबळे, प्राचार्य डॉ. निलेश हांडे, प्राचार्य सौ. सारिका लाजुरकर, प्राचार्य सौ. एस. इनामती, मुख्याध्यापक मधू बोराटे, प्राचार्य निलेश गोंधळी, मुख्याध्यापक सिद्धार्थ गोडबोले, प्राचार्य सौ. सुनीता राणे आदींसह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.

## तळा कॉलेजमध्ये एक दिवसीय पुनर्रचित अभ्यासक्रम आभासी कार्यशाळेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । तळा**

द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा ता.तळा व मुंबई विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि.१३ जुलै २०२१ रोजी एक दिवसीय पुनर्रचित अभ्यासक्रम कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन मुंबई विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. धनाजी गुरव यांनी केले.यावेळी बोलतांना त्यांनी मराठी विषयाचा बदललेला अभ्यासक्रमा विषयी आपली भूमिका मांडताना सांगितले की, या नव्या अभ्यासक्रमामध्ये नव्यानेच आधुनिक तंत्रज्ञान परिचय व प्रात्यक्षिक – पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन, युनिकोड टंकलेखन, ई मेल लेखन, ब्लॉगलेखन आणि विकिपिडीयासाठी लेखन आणि स्पर्धा परीक्षा मराठी व्याकरण यांचा समावेश करण्यात आलेला आहे.सद्या तंत्रज्ञानाचे युग आहे आणि यामध्ये मराठी साहित्य आणि भाषा हे अधिकाधिक समृद्ध होण्यासाठी अशा पद्धतीच्या अभ्यासक्रमांची गरज निर्माण झालेली आहे तसेच विद्यार्थ्यांना नोकरी आणि स्वयंरोजगाराच्या संधी मिळतील. ही गरज ओळखून मुंबई विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाने हा अभ्यासक्रम तयार केलेला आहे. या अभ्यासक्रमाचे स्वागत नक्कीच प्राध्यापक आणि विद्यार्थी करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यशाळेस अध्यक्ष तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. मंगेश देशमुख लाभले होते. कार्यशाळेस महावियालयाचे प्राचार्य डॉ. डॉ.कैलास निंबाळकर यांनी उपस्थित राहून कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या.कार्यशाळेचे समन्वयक डॉ.नानासाहेब शामराव यादव, सदस्य मराठी अभ्यास मंडळ, मुंबई विद्या–पीठ यांनी प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले.या कार्यशाळेमध्ये निबंधवाचक म्हणून डॉ.निधी पटवर्धन गोगटे जोगळेकर कॉलेज रत्नागिरी, विषय : आधुनिक तंत्रज्ञान परिचय व प्रात्यक्षिक– पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन व युनिकोड टंकलेखन, प्रा.प्रमोद शंकर पवार, पार्वतीबाई चौगुले स्वायत्त महाविद्यालय, मडगांव, गोवा, विषय : ईमेल लेखन, ब्लॉगलेखन आणि विकिपिडीयासाठी लेखन, डॉ.गोविंद काजरेकर, रावसाहेब गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स आणि सरस्वतीबाई गणेशशेठ वडके कॉलेज ऑफ आर्ट्स,बांदा ता.सावंतवाडी, विषय : मराठी व्याकरण (स्पर्धा परीक्षा) यांनी वरील विषयांवर अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. या सर्व सत्रांचे सत्राध्यक्ष : डॉ.नितीन आरेकर, सी.एच.एम.कॉलेज, उल्हासनगर यांनी आपल्या मनोगतात नवीन अभ्यासक्रमाचे स्वागत निक्कीच प्राध्यापक करतील असा विश्वास व्यक्त करत अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांना त्यांनी धन्यवाद दिले. या कार्यशाळेसाठी मुंबई विद्यापीठ अभ्यासमंडळाचे सर्व सदस्य, द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील प्राचार्य, सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी तसेच तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी सदस्य, पदाधिकारी आणि यांनी सहकार्य केले.या सर्वांचे आभार डॉ.नानासाहेब यादव यांनी व्यक्त केले.

## अबोली महिला रिक्षा चालकास मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अबोली महिला रिक्षा चालक महिलेला चार प्रवाशांनी मिळून रिक्षा भाडेच्या वादातून मारहाणीची घटना घडली आहे.

एकाच कुटूंबातील चार जणांनी मिळून रिक्षा चालक महिला सविता बेले यांना मारहाण केली आहे. त्यावेळी अबोली महिला रिक्षा चालक संघटनेचे संस्थापक / अध्यक्ष संतोष भगत व बेलापूर, नेरुळ विभागीय अबोली महिला रिक्षा संघटनेचे उपाध्यक्ष अंजना शिंदे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन वरीष्ठ पोलीस निरीक्षक शाम शिंदे यांच्याकडे भेट घेऊन त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राजीप नेणवली शाळेतील विद्यार्थ्यांना मिळणार शुद्ध पाणी

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील राजीप नेणवली शाळेत स्वदेस फाउंडेशन मार्फत जलशुद्धीकरण यंत्रणेचे नुकतेच हस्तांतर करण्यात आले.

तसेच वृक्षलागवड करण्यात आले. जि.प.शाळा–नेणवली येथे गेल्या दोन वर्षात गाव सक्षमीकरण अंतर्गत शाळा नेणवली येथे ग्रंथालय, स्वछतागृह, प्रयोग साहित्य, जलशुद्धीकरण आदी योजना व भौतिक सुविधा कार्यान्वित झाल्या आहेत. असे शिक्षक राजेंद्र अंबिके यांनी सांगितले.


अर्जदाराचे वकील : ॲड.जितेंद्र परशुराम म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो. यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.७१८/२०२१

ने.ता.१८/०८/२१

श्री.संजय तुलशीराम मुंगाजी — अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत ओवळे,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार श्री.संजय तुलशीराम मुंगाजी यांची आजी मयत शांताबाई कृष्णा मुंगाजी ह्यांचा दि.११/०९/१९८५ रोजी गाव ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मृत्यू झालेला आहे आणि अर्जदार यांनी आपल्या आजीच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू श्री.संजय तुलशीराम मुंगाजी यांची आजी मयत शांताबाई कृष्णा मुंगाजी यांचा मृत्यू वर नमूद ठिकाणी झाला आहे किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर या जाहीर नोटीशीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांचेकडून योग्य तो पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.१४/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिरनेर, ता.पनवेल, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी १) श्री.नरेंद्र जनार्दन फोफेरकर, २) श्री.रुपेश जनार्दन फोफेरकर, ३) सौ.मालती जनार्दन फोफेरकर, ४) सौ. आशा जनार्दन फोफेरकर रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १९५ | १ | ०–४०–२० पो.ख.०–०१–५० एकूण ०–४१–७० पैकी ०–२१–७० | ४.३१ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, गहाणखत, वहिवारंग, वहिवाट, किवकिवडा, हक्कहितसंबंध वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदरचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१५/०७/२०२१
स्थळ : उरण

सही/–
ॲड.योगेश नामदेव म्हात्रे
रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
मो.नं.९८१९९१०८०८/८०९७१०८०६०

मे.मुजावर साो

अर्जदारातर्फे वकील
ॲड.विक्रम पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.८११/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०८/२१

श्री.योगेश नारायण भोईर, वगैरे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : घोट, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अनु क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ३२६ | ७ | ०–११–१२ | १–८१ |
| २ | ५३ | २ | ०–३७–०० | ६–९४ |
| ३ | १३४ | २ | ०–३४–०४ | ६–०६ |

कै.नारायण महादू भोईर हे दि.३०/०६/२०१८ रोजी मौजे : ओवेगाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या असून, त्यांस अर्जदार क्र.१ श्रीमती.इंदुबाई नारायण भोईर, मुलगी व अर्जदार क्र.२ श्री.योगेश नारायण भोईर व अर्जदार क्र.३ सौ.प्रगती प्रकाश पाटील व अर्जदार क्र.४ सौ.प्रमिला दर्शना ठाकूर हे चार मुलगा व मुली असे वारसदार आहेत.

अर्जदार यांनी कै.नारायण महादू भोईर यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.१४/७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


## भारत मुंबई टर्मिनल पोर्ट, न्हावा-शेवा उरण येथील सुरक्षा रक्षकांच्या समस्यांबाबत बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मौजे उरण जि. रायगड येथील भारत मुंबई टर्मिनल पोर्ट, न्हावा–शेवा, उरण येथील सुरक्षा रक्षकांच्या समस्यांबाबत कामगार मंत्री ना. हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस रायगडच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे तसेच श्री. प्रशांत पाटील, सौ.भावना घाणेकर, सुरक्षा रक्षक कमिटीचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर पाटील, संबंधित अधिकारी आदी उपस्थित होते. खाजगी सुरक्षा एजन्सीचे कंत्राट मूळ मालकाने रद्द केल्यामुळे सुमारे ११३ सुरक्षा रक्षक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियांच्या उपजीविकेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे थकीत भत्ते मूळ मालकामार्फत देण्याबाबत कामगार विभागाने कार्यवाही करावी तसेच भारत मुंबई टर्मिनल पोर्ट, न्हावा–शेवा येथे कार्यरत असणाऱ्या खाजगी कंपनीने भविष्यात सुरक्षारक्षकांची नेमणूक करतेवेळी प्रकल्पग्रस्त म्हणून या कर्मचाऱ्यांना पुन्हा नोकरीमध्ये प्राधान्य द्यावे व सुरक्षारक्षकांनी रायगड सुरक्षा रक्षक मंडळाममध्ये नोंदणी प्रक्रिया करावी, अशा सूचना यावेळी मंत्री महोदयांनी दिल्या.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## अनधिकृत बांधकामे सहज कळावी यासाठी 'स्मार्ट वॉच' यंत्रणा राबवणार

दाखविण्यात आले. या यंत्रणेद्वारे अनधिकृतपणे केलेली बांधकामे मुख्यालयात बसून देखील पहाता येणे शक्य होणार आहे. येत्या काही दिवसात ही यंत्रणा महापालिका राबविणार आहे.

लॉकडाऊन चे नियम पायदळी तुडवून परवानगी नसताना देखील जी हॉटेल्स उशीरा पर्यंत सुरु ठेवली जात आहे अशा हॉटेल्सवर सक्त कारवाई करण्याचे आदेश यावेळी अधिकारी आणि प्रभाग अधिकारी यांना आयुक्त गणेश देशमुख यांनी दिले. तसेच रोज चार नंतर अत्यावश्यक सेवेशिवाय जी दुकाने उघडी राहतील त्यांच्यावरतीही कठोर कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. या बैठकीस उपायुक्त विठ्ठल डाके,उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव, चार प्रभागाचे प्रभाग अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

## एका दिवसाच्या पावसाने उडवला उरण नगरपालिकेच्या नालेसफाईचा फज्जा

शहरातील पावसाळ्यात ही अवस्था नेहमीच होत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. काही ठिकाणी तर परप्रतियांनी अतिक्रमण केल्याने व काहींनी भराव करून उंचवटा निर्माण केल्याने जुनी घर खाली गेली आहेत. त्यामुळे पावसाळ्यात मुसळधार पाऊस पडल्यानंतर पाण्याचा निचरा व्यवस्थित न झाल्याने हे पाणी खाली घरे आहेत त्यांच्या घरांना जात आहे. तरी नगरपालिकेने पावसाळ्यातील पाण्याचा निचरा व्यवस्थित होण्यासाठी नालेसफाई व पाण्याचा मार्ग याची त्वरित सोय करावी जेणेकरून पावसाळ्यात पडणाऱ्या पावसामुळे त्यांच्या घरांना तरी पाणी जाणार याची दक्षता घेणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## पाली– खोपोली मार्गावर अवजड वाहतूक ; कमकुवत पुलांना धोका

खडी, ग्रिट लोखंडी कोईल, लोखंडी पाइप यांची बेकायदेशीर ओव्हरलोड वाहतुक होत आहे.त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही.पाली – खोपोली महामार्गावर अवजड वाहतुकिमुळे अपघात वाढले आहेत. त्यामुळे हा महामार्ग प्रवाशांसाठी असुरक्षित झाले आहे.या मार्गावरील अवजड वाहतुकीवर थांबने गरजेचे आहे. या सर्व प्रकार कडे संबंधित खात्याकडून मात्र कानाडोळा होत असल्याचे दिसून येत आहे.

## विठूमाऊली भक्तांसाठी भजनाचा आस्वाद आणि आरतीचे थेट प्रक्षेपण

आमदार प्रशांत ठाकूर, भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण मल्हार टिव्ही व इतर सोशल मीडियाच्या माध्यमातून २० जुलै रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

पंडित उमेश चौधरी व पंडित प्रतापराज पाटील यांना तबला साथ कुणाल पाटील, गायनसाथ मंगेश चौधरी व अक्षय चौधरी, तर सुप्रिया जोशी यांची संवादिनीची साथ लाभणार आहे. या भक्तीमय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उस्ताद अजीम खान करणार आहेत. ते भक्तांसमोर संगीतामधून वारीचे महत्व अधोरेखित करणार आहेत. मागील वर्षीही अशाच प्रकारे 'विठू नामाचा गजर' करून भक्तगणांना दर्शनाचा लाभ देण्यात आला होता. त्यावेळी १६६७८ भाविकांनी ऑनलाईन पद्धतीने लाभ घेतला होता. त्या अनुषंगाने या वर्षीही हा भक्तीमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.


**गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९३२१५९२११३/८१०४४७७४०

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## दहा ते बारा जणांची दोघांना मारहाण, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दहा ते बारा जणांनी दोघांना लोखंडी साळई आणि लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली आहे. आरोपी विरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारगाव येथील अमोल अरविंद डवळेकर हा सुहास म्हात्रे यांच्या डंपरचे चालक व इतर मजुरांना पगार देण्यासाठी भगवती बिल्डर, सेक्टर ५, पुष्पक नगर, दापोली येथील साइटवर बिल घेण्यासाठी त्याचा मित्र किरण भगत यांचसह गेला होता. यावेळी त्याने सुहास म्हात्रेचे नाव सांगून ५० हजार रुपये घेतले. त्यावेळी तेथे दापोली गावातील दहा ते बारा जण हजर होते. त्यांनी दापोलीच्या गावकीच्या वादात कशाला आलात असे म्हणून अमोल आणि किरण यांना हातातील लोखंडी सळई व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

# माथेरान नगरपरिषदेचा वळविण्यात आलेला पुन्हा माथेरान नगरपरिषदेकडे वर्ग

## माथेरानचे पर्यटन राजदूत आदेश बांदेकर यांच्याकडे नगराध्यक्षा यांनी केला होता पाठपुरावा

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरानच्या विविध पॉईंट्सच्या सुशोभीकरणासाठीचा आलेला अडीच कोटी रुपयांचा निधी २२ मार्च २०२१ च्या शासन निर्णयानुसार कर्जत आणि खोपोली नगरपरिषदेकडे वर्ग करण्यात आला होता. माथेरान या दुर्गम भागातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असणारी महत्वपूर्ण विकास कामे पूर्ण करण्यासाठी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला होता. पर्यटकांच्या माथेरान मधील आवडत्या प्रेक्षणीय पॉईंट्स पैकी वन ट्री हिल, मालडुंगा, खंडाळा, आणि बेलवर्ड या पॉईंट्स साठी जवळपास अडीच कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला होता. या चारही पॉईंट्स ची निम्म्याहून अधिक कामे पूर्णत्वास आलेली असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात आलेला निधी परस्पर कर्जत आणि खोपोली या रायगड जिल्ह्यातील नगरपरिषदेच्या विकास कामांसाठी नेण्यात आला आहे. सदरचा निधी कुठल्याही परिस्थितीत माथेरानच्या विकास कामासाठी आणणे आवश्यक बनले होते.

याकामी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि नगरपरिषदेचे सभागृह गटनेते प्रसाद सावंत यांनी माथेरानचे पर्यटन राजदूत आदेश बांदेकर यांची भेट घेऊन याबाबत सविस्तर चर्चा केली. बांदेकर यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून माथेरानच्या विकासात्मक कामांसाठी मंजूर केलेला निधी पुन्हा माथेरान नगरपरिषदेकडे वर्ग करण्यात यावा असे सांगितल्यावरून हा अडीच कोटी रुपयांचा निधी माथेरान नगरपरिषदेच्या खात्यावर जमा करण्यात आला आहे. यासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे, रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी सुध्दा अनेकदा प्रयत्न केले होते. इथल्या विकास कामांसाठी प्राप्त झालेला निधी विनाकारण अन्य नगरपरिषदेच्या विकास कामासाठी नेणे ही खेदाची बाब असून तो पुन्हा आपल्याकडे वर्ग करणे हे सुध्दा अशक्यप्राय होते. परंतु पर्यटन राजदूत बांदेकर यांनी केवळ माथेरानवर असलेल्या निस्सीम प्रेमापोटी पुन्हा उपलब्ध करून दिला आहे. भविष्यात माथेरानचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आदेश बांदेकर यांचे मोलाचे सहकार्य असणार आहे असे सुज्ञ नागरिकांमधून बोलले जात आहे

## विक्रांत पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माझा प्रभाग माझी जबाबदारी या अनुषंगाने काम करणारे व प्रभागाला आपल्या कुटुंब व नागरिकांना आपल्या कुटुंबातील सदस्य मानणारे नगरसेवक विक्रांत पाटील यांचा वाढदिवस यंदाही प्रभागात सामाजिक उपक्रम व विकास कामे यांच्या उद्घाटनाने साजरा झाला. नागरिकांच्या आरोग्य चांगलं आणि उत्तम रहावे या करीता त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्त १३-१७ जुलै मोफत होमिओपॅथी आरोग्य चिकित्सा शिबिर व मोफत औषधे वाटप आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ घ्यावा अशी विनंती यावेळी नगरसेवक विक्रांत पाटील यांनी सर्व नागरिकांना केली आहे.

या शिबीरा सोबत पर्यावरणाचे महत्त्व आणि जागरूकता लोकांच्या मध्ये व्हावी या हेतूने वाढदिवसाच्या शुभेच्छा द्याला येणाऱ्या प्रत्येक नागरिकांना मोफत रोप वाटप ही करण्यात आले.प्रभागातील कामांच्या बाबत नेहमी तत्पर असणारे नगरसेवक विक्रांत पाटील यांनी वाढदिवसानिमित्त नगरसेवक निधीतून स्ट्रीट लाईट पोलचे लोकार्पण करण्यात आले.विक्रांत पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याकरिता प्रामुख्याने पनवेल महानगरपालिका महापौर सौ कविता चोतमल, सभागृह नेते परेश ठाकुर,भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्राचे सरचिटणीस राहुल लोणीकर,सुशील मेंगडे, युवा मोर्चा उपाध्यक्ष अनुप मोरे,निखिल चव्हाण,योगेश माईंद. युवा मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रशांत कदम,समीर कदम आणि मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.याच बरोबर प्रभागातील जेष्ठ नागरिक आणि नागरिक आपल्या लाडक्या विक्रांत दादांना शुभेच्छा आणि आशीर्वाद देण्याकरिता उपस्थित होते. नगरसेवक विक्रांत पाटील यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्याकरीता आलेल्या सर्व मान्यवरांचे आणि नागरिकांचे आभार मानले.



## पनवेल कार्यक्षेत्राचा पॉझिटिव्हीटी दर कमी होऊन २.५ वर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विविध उपाययोजना आणि निर्बंध याद्वारे पनवेल महापालिका क्षेत्रात रुग्णसंख्या आटोक्यात आणण्यासाठी पालिका प्रयत्नशील आहे. पालिका कार्यक्षेत्रात पॉझिटिव्हीटी दर देखील कमी होऊन २.५ वर आला आहे. परंतु असे असले तरीही

लॉकडाऊनचे नियम शिथिल झाल्यापासून अनेकवेळा नागरिक विनाकारण फिरत असल्याचे दिसून येत आहेत. कोरोनाची दुसरी लाट ओसरत असली तरीही अजून संपलेली नाही. मागील महिन्यात पॉझीटिव्ह येणाऱ्या नागरिकांची संख्या कमी झाली होती मात्र गेल्या काही दिवसापासून या संख्येत कमी- अधिक प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. डेल्टा प्लस उत्परिर्वतित विषाणूचा धोकाही वाढला आहे. एकूणच साऱ्या पार्श्वभूमीवर कोरोना चाचण्याचे प्रमाण वाढविण्याच्या सूचना आयुक्त गणेश देशमुख वैद्यकिय आरोग्य विभागास दिल्या होत्या. त्यानूसार गेल्या चार दिवसापासून मोठ्या प्रमाणावर कोरोनाच्या चाचण्या पनवेल कार्यक्षेत्रात केल्या जात आहेत.

रायगड जिल्ह्याप्रमाणेच पन-वेल कार्यक्षेत्रातील पॉझीटिव्हीटी रेट कमी करण्याच्या दृष्टीने आणि कोविडचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी पनवेल कार्यक्षेत्रात दररोज सरासरी ४००० आरटीपीसीआर आणि न्टीजन चाचण्या करण्याचे आदेश आयुक्त गणेश देशमुख यांनी दिले होते. त्यानुसार गेल्या चार दिवसांमध्ये जवळपास २२ हजाराहून अधिक कोरोनाच्या चाचण्या करण्यात आल्या आहेत. याचा परिणाम हळूहळू दिसू लागला असून पनवेल कार्यक्षेत्राचा पॉझीटिव्हीटी दर कमी होऊन हा दर २.५ झाला आहे. संभाव्य तिसऱ्या लाटेची सगळीकडे चर्चा सर्वत्र सुरू असताना महापालिकेने देखील याची पूर्वतयारी सुरू केली आहे. उपायुक्त सचिन पवार आणि मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या या चाचण्या पनवेल कार्यक्षेत्रातील पनवेल, न्यू पनवेल,कामोठे, कळंबोली, खारघर, तळोजा या नोडमधील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार करण्यात येत आहे. या नोडमधील गर्दीची ठिकाणे, बाजार, रेल्वे स्थ-ानके, बस स्थानके, कंटेन्मेंट झोन, शासकीय आस्थापना, दुकाने अशा सर्व ठिकाणी आरटीपीसीआर चाचण्या केल्या जात आहेत. प्रभाग अधिकारी आणि पोलिस विभागाशी समन्वय साधून सर्व डॉ. प्रियांका माळी यांच्या नियोजनाप्रमाणे विविध नोडमधील संबधित ना-गरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरर्स त्यांच्या टिम सहीत सर्वत्र जाऊन आरटीपीसीआर व न्टीजन चाचण्या करीत आहेत.

## गावठी हातभट्टी दारू तयार करण्याचे साहित्य केले हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य व चार टाक्या असा मुद्देमाल पनवेल तालुका पोलिसांनी हस्तगत केला आहे. दिघाटी गाव परिसरात बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी लागणारे गुळाचे अंबवलेले मिश्रणाने भरलेल्या २०० लि. क्षमता असलेल्या चार टाक्या ज्याची किंमत जवळपास २६ हजार इतकी आहे. असा पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वपोनि रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि कारोटे, सपोनि पगार, पोना रूपेश पाटील, पोना कानु आदींच्या पथकाने ताब्यात घेऊन एका व्यक्तीविरोधात कारवाई केली आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सदरहू मिळकत १) श्रीमती.शोभा सुरेश मुगे, २) श्री.प्रसाद विश्वास आचरेकर यांचे मालकीची, कसवणुकीची, वहिवाटीची व ताबेकब्जातील, शेतजमीन मिळकत मौजे : मालडुंगे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मालडुंगे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ८२/२/अ/१ | २-८४-८०<br>पो.ख. ०-४३-७०<br>एकूण ३-२८-५०<br>पैकी १-९१-३०<br>पो.ख. ०-४३-७० | ४.५१ |
| | एकूण २-३६-० यापैकी ०-२६-० हे.आर.पॉ. क्षेत्र शोभा सुरेश मुंगे व प्रसाद विश्वास आचरेकर यांचा विक्री क्षेत्र विषय | ३.३ |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

मौजे : मालडुंगे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं.८२/२/अ/१ क्षेत्र ०-२६-० (हे.आर.पॉ.) एवढी मिळकत आमचे अशिल हेमंत बाळकृष्ण पाटील यांनी कायम फरोक्त खताने विकत घ्यावयाची ठरविली आहे. सदरहू मिळकत ही १) श्रीमती.शोभा सुरेश मुगे रा.नवजीवन सोसायटी बिल्डींग नं.९ अ फ्लॅट नं.४, पहिला मजला, मोरी रोड, माहिम वेस्ट. मुंबई ४०००१६ २) श्री.प्रसाद विश्वास आचरेकर रा.७/५ जेटी, माहिम वेस्ट. यांचे मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील व कसवणुकीतील असून महसूल दप्तरी सातबारा सदरी त्यांची नावे लागलेली आहेत. वरील सदरहू मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. व तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहीत धरण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.१५/०७/२०२१

सही/-
अॅड.दिनेश दत्तात्रय पाटील
जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,
गावदेवी मंदिरा समोर, राम गणेश गडकरी
मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.८८७९८९७०६९



मा.राव साहेब

अॅड.रजनी गोवारी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.७११/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२१

१) बिग्रेडीयर संजय राय
उ.व. ५८, धंदा : नोकरी
२) अंशुमन राय
उ.व. ३२, धंदा : नोकरी
३) यश किर्ती राय
उ.व. २५, धंदा : शिक्षण
सर्व रा.२६२, न्यू सोहबतिया बाग
इलाहाबाद उत्तरप्रदेश २११००६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै.गीता राय यांचे दि.२२/०४/२०१७ रोजी निधन झाले आहे. यांचे मालकीचे व ताबेकब्जातील फ्लॅट नं.एच २८३ इकॉनामी टाइप, पहिला मजला व पार्कींग नं.ओसीपी एच ५३, रघुनाथ विहार आर्मी को.ऑ.सोसा.लि., प्लॉट नं.१, सेक्टर १४, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१० येथील खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मु.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अनु क्र. | मिळकत | वर्णन |
|---|---|---|
| १ | निवासी सदनिका | प्लॅट नं.एच २८३ इकॉनामी टाइप, पहिला मजला व पार्कींग नं.ओसीपी एच ५३, रघुनाथ विहार आर्मी को.ऑ.सोसा. लि., प्लॉट नं.१, सेक्टर १४, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१० |

वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही कै.गीता राय व अर्जदारा क्रं.१ यांचे संयुक्त मालकीची व ताबेकब्जातील आहेत. कै.गीता राय यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार यांचे नावे होण्यासाठी अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै.गीता राय यांना अर्जदार हेच सदर मिळकती संदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरितीने हरकती न घेतल्यास हे मा.न्यायालय १) बिग्रेडीयर संजय राय, २) अंशुमन राय, ३) यश किर्ती राय हे कै.गीता राय यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१४/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



श्री.भाकरे सो.कोर्ट

प्रो.जमा.६-२५

अर्जदाराचे वकील
दिपाली रामदास गावंड
वकील उच्च न्यायालय

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.६८४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०८/२१

१) श्री.गंगाराम दत्तू पाटील
वय : ७५ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.अनंत दत्तू उर्फ दत्तात्रेय पाटील
वय : ७४ वर्षे, धंदा : शेती
रा.पाटील हाऊस, एच.ओ.सी.कॉलनी जवळ,
स्टेटस हॉटेलसमोर, ठाणा नाका रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.भरत दत्तू उर्फ दत्तात्रय पाटील
वय : ६४ वर्षे, धंदा : शेती
४) कै.शनिवार दत्तू पाटील तर्फे वारस
४/१) श्रीमती.चंद्राबाई शनिवार पाटील
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
४/२) श्री.गोपीनाथ शनिवार पाटील
वय : ४० वर्षे, धंदा : शेती
४/३) श्री.तुळशीराम शनिवार पाटील
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती
४/४) श्री.गोरक्षनाथ शनिवार पाटील
वय : ३५ वर्षे, धंदा : शेती
अ.क्र.१, ३ ते ४/१ ते ४/४
रा.मु.पो.तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड
४/५) सौ.दर्शना जगदीश मढवी
पुर्वाश्रमीची कु.दर्शना शनिवार पाटील
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड
४/६) सौ.दया भुषण पाटील
पुर्वाश्रमीची कु.दया शनिवार पाटील
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.धर्माबाई मोतीराम फुलोरे
पुर्वाश्रमीची कु.धर्माबाई दत्तू पाटील
वय : ६९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.डावलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.जानकूबाई गोपीनाथ माळी
पुर्वाश्रमीची कु.जानकूबाई दत्तू पाटील
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.पो.खैरणे, ता.पनवेल, जि.रायगड
७) सौ.शेवती मनोहर पाटील
पुर्वाश्रमीची कु.शेवती दत्तू पाटील
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.दत्तू काळू पाटील हे दिनांक २५/०४/२०१९ रोजी मौजे : तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाच्या मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | १८१ | - | ०-८४-० | ६.३१ |
| २ | १७५ | - | ०-७३-१०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण ०-७४-६० | ५.०० |
| ३ | १८६ | | ०-५७-० | ४.१२ |
| ४ | १८७ | | २-३६-००<br>पो.ख. ०-०५-३०<br>एकूण | २१.३७ |
| ५ | १८९ | १ | ०-६०-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकूण ०-६२-०० | ५.५० |
| ६ | १९१ | - | २-२५-१० | १९.२५ |
| ७ | १९२ | - | १-९७-००<br>पो.ख. ०-०४-००<br>एकूण | १२.२५ |

कै.दत्तू काळू पाटील यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/०७/२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.गोडसे मॅडम

अर्जदारातर्फे वकील
अॅड.विक्रम पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.८१२/२०२१
नि.नं.८
ने.ता.२०/०८/२१

श्री.बबन अर्जुन पाटील वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : घोट, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : घोट, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | अनु. क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| चाळ | १ | ४५ | १/ब | ०-३३-० | ५-२८ |
| | २ | ४१ | २ | ०-३०-०० | २-१९ |
| घोट | ३ | ४९ | - | २-१२-०४ | ९-१४ |
| | ४ | ५० | - | ९-११-०० | ३३-१९ |

कै.अर्जुन कानु उर्फ काना पाटील हे दि.२०/०३/१९९१ रोजी मौजे : घोट, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या असून, त्यांना अर्जदार कै. अर्जुन कानु उर्फ काना पाटीलचे वारस १) श्री.नारायण अर्जुन पाटील वय : ७२, धंदा : शेती रा.गावदेवी मंदिर, घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड, २) श्री.बबन अर्जुन पाटील, वय : ५९, धंदा : शेती, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ३) श्री.मारुती अर्जुन पाटील, वय : ६८, धंदा : शेती, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ४) बाबुराव उर्फ बाबू अर्जुन पाटील (मयत) वारस ४/१) श्रीमती.बेबीबाई लहू माळी, वय : वर्षे, धंदा : गृहिणी, रा.नितळस, ता.पनवेल, जि.रायगड ४/२) श्रीमती.साखरुबाई केशव पाटील वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.घोट कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ४/३) श्री.अनंता बाबुराव पाटील वय : ५५ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, ता.पनवेल, जि.रायगड ४/४) श्री.दशरथ बाबुराव पाटील वय : ५२ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, ता.पनवेल, जि.रायगड ४/५ ३ श्रीमती.जानकी बुधाजी पाटील, वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.वळवली, ता.पनवेल, जि.रायगड ४/६) गंगुबाई बाबुराव पाटील पत्नी (मयत) ५) बारकुबाई चरु खुटारकर (मयत) ५/१) श्रीमती.रामुबाई जनार्दन पाटील वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड ५/२) श्री.रामदास चरु खुटारकर, वय : ६६ वर्षे, धंदा : शेती, रा.घर नं.२६, नावडे गाव, कृष्णा मंदिर जवळ, ता.पनवेल, जि.रायगड ५/३) अनंता चरु खुटारकर (मयत) वारस, ५/३/१) श्री.मिलींद अनंता खुटारकर, वय : ३७ वर्षे, धंदा : शेती, रा.नावडे गाव, कृष्णा मंदिर जवळ, ता.पनवेल, जि.रायगड ५/३/२) शितल सचिन घरत, वय : ३५ वर्षेद्व धंदा : गृहिणी रा.घर नं.५१, राईस मिल जवळ जासई, ता.पनवेल, जि.रायगड ५/३/३) प्रणिता संदीप भोपी, वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.तुरमाळे, ता.पनवेल, जि.रायगड ५/३/४) प्रियंका मयुर पाटील वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी, रा.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड ५/३/५) हौसा अनंता खुटारकर (पत्नी) वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.नावडे गाव, कृष्णा मंदिर जवळ ५/४) श्री.दशरथ चरु खुटारकर, वय : ५८ वर्षे, धंदा : शेती, रा.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड ५/५) श्री.यशवंत चरु खुटारकर, वय : ५५ वर्षे, धंदा : शेती, रा.घर नं.२८ नावडे गाव, कृष्णा मंदिर जवळ, ता.पनवेल, जि.रायगड ५/६) श्री.प्रभाकर चरु खुटारकर, वय : ४९ वर्षे, धंदा : शेती, रा.नावडे गाव, कृष्णा मंदिर जवळ, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ५/७) निराबाई काळुराम नाईक, वय : वर्षे, धंदा : गृहिणी, रा.घर क्र.१७९ क, टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड ६) नागुबाई पांगा पाटील (मयत) वारस ६/१) श्रीमती.कमळाबाई बुधाजी भोपी, वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.नितळस, ता.पनवेल, जि.रायगड ६/२) बबन पांगा पाटील (मयत) वारस ६/२/१) श्री.अनिल बबन पाटील, वय : ४१ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/२/२) श्री.सुनील बबन पाटील वय : ४१ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/२/३) कविता उद्देश महादे, वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.घोट कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/२/४) गीता बबन पाटील, वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.घोट कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/२/४) बेबीबाई बबन पाटील (पत्नी) वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.घोट कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/३) कै. साईनाथ चांगा पाटील (मयत) वारस ६/३/१) श्री.संदेश साईनाथ पाटील, वय : २८ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, कोयनोवळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/३/२) श्री.सुरज साईनाथ पाटील, वय : २२ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/३/३) संध्या रुपेश भोईर, वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी रा.भोईरवाडा, ता.पनवेल, जि.रायगड ६/३/४) सुरक्षा साईनाथ पाटील, वय : २४ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/३/५) वंदना साईनाथ पाटील (पत्नी) वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/४) श्री.अभिमन्यू पांगा पाटील वय : ५३ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/५) श्री.जानू पांगा पाटील, वय : ४८ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ६/६) श्री.प्रकाश पांगा पाटील, वय : ४४ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, ता.पनवेल, जि.रायगड ६/७) श्री.संतोष पांगा पाटील, वय : ५३ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, ता.पनवेल, जि.रायगड ६/८) श्रीमती.लक्ष्मीबाई बाळाराम उलवेकर वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी, रा.पाले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड ६/९) श्रीमती.गुलाब हरिश्चंद्र पाटील वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड ६/१०) श्रीमती.इंदिराबाई राम पाटील, वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.वळवली, ता.पनवेल, जि.रायगड ६/११) श्रीमती.माया गोपीनाथ पाटील, वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड ६/१२) श्रीमती.कल्पना भरत सांगडे, वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.नितळस, ता.पनवेल, जि.रायगड ७) हिराबाई सखाराम निघुकर (मयत) वारस ७/१) श्रीमती.शकुंतला गणपत पाटील वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ७/२) श्री.तुकाराम सखाराम निघुकर, वय : ५८ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ७/३) श्री.संजय सखाराम निघुकर, वय : ३४ वर्षे, धंदा : शेती, रा.घोट, कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड ८) शांताबाई अनंता पावशे (मयत) वारस ८/१) श्रीमती.ताराबाई परशुराम गोंधळी, वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड श्रीमती.शेवंता कृष्णा म्हात्रे, वय : ७५ वर्षे, धंदा : गृहिणी, रा.मुर्बी, ता.पनवेल, जि.रायगड.

अर्जदार यांनी कै.अर्जुन कानू पाटील यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.१४/७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## बनावट रबरी स्टँप बनवून फसवणुकीचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका रूग्णालयाचे बनावट लेटरहेड व रबरी स्टँप (शिक्का) बनवून घेण्याचा प्रयत्न उघडकीस आला आहे.

कामोठे वसाहतीमधील माऊली अक्सिडंट एन्ड जनरल रूग्णालयाचे बनावट लेटरहेड तयार करून त्याद्वारे रूग्णालयाचा रबरी स्टँप (शिक्का) बनवून घेण्याचा प्रयत्न केल्याचे उघडकीस आले. याबाबत कामोठे पोलिसांनी या व्यक्तीविरोधात बनावटगिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे व तो गुन्हा नेरूळ पोलिस ठाणे येथे वर्ग करण्यात आला आहे.

## महिलेची ऑनलाईनद्वारे ७२ हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका महिलेची ऑनलाईनद्वारे फोन करून ७२ हजारांची फसवणुक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

सुशिला पाटील यांना एका इसमाने मोबाईल फोन करून त्यांचे सिमकार्ड व्हेरिफिकेशन करायचे आहे असे सांगून त्याकरीता मोबाईलवर टिम व्हूअर एप डाऊनलोड करावयास सांगून त्याद्वारे आरोपीने त्यांच्या एसबीआय बँकेतील अकाऊंटमधील ७२ हजार ट्रान्सफर करून त्यांची ऑनलाईन फसवणूक केल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पावसाने पुन्हा जोर धरल्याने बोर्ली स्थानकावर पाणी साचले : जनजीवन विस्कळीत

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेले दोन दिवस जोरदार पावसानंतर आज दुपारी चार वाजेपासून पावसाने पुन्हा जोर धरला असून बोर्ली स्थानकावर पाणी साचल्याने सायंकाळच्या वेळी शेत भातीची कामे करून परतणा–या तसेच नागरिक व प्रवासी वर्गाला साचलेल्या पाण्यातून वाट काढत कसरत करावी लागली. मुरुड सह बोर्ली, मांडला, नांदगाव मजगांव उसरोली परीसरात पावसाने पुन्हा जोर धरला असून बोर्ली स्थानकावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने वाहतूक ठप्प होऊन जनजीवनावर परिणाम दिसून आला. गेल्या दोन तीन दिवसांपासून कोकणात मान्सून सक्रिय झाला असून पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.जोरदार पडत असलेल्या पावसामुळे अलिबाग व मुरुड तालुक्याला जोडणारा दुवा असलेला काशिद चा जूना पूल कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे.पावसामुळे कोर्लई,बोर्ली मांडला,बारशिव, काशिद, नांदगाव मजगांव उसरोली भागात अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचले तर बोर्ली स्थानकावर पाणी साचल्याने याचा जनजीवनावर परिणाम दिसून आला.



# शासनाकडे राज्यातील मच्छिमारांची डिझेल परताव्याची २२२ कोटी रक्कम थकीत

**दै.रायगड नगरी । उरण**

मागील चार वर्षांपासून राज्यातील मच्छिमारांच्या डिझेल परताव्याची राज्य सरकारकडे २२२ कोटींहून अधिक रुपयांची रक्कम थकीत आहे. एक ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या मासेमारी हंगामाची लगबग सुरू होण्यापूर्वी परताव्याची रक्कम मिळाली नाही तर याआधीच थकित परताव्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या राज्यातील मच्छिमारांच्या संस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार असल्याची साधारण भिती संस्थांकडून व्यक्त केली जात आहे.



राज्याला ७२० किमीचा सागरी किनारा लाभला आहे.मात्र या अथांग सागरात मासळीचे प्रमाण कमी झाले आहे.यामध्ये आता दिवसेंदिवस विविध समस्यांची भर पडत चालली आहे.यामध्ये लागोपाठ आलेल्या पाच – सहा नैसर्गिकरित्या वादळे–चक्रीवादळाने तर अनेक दिवस मासेमारी व्यवसायच बंद ठेवण्याची पाळी राज्यातील मच्छिमारांवर आली आहे.समुद्रात सातत्याने जाणविणाऱ्या मासळीच्या दुष्काळामुळे तर खोल समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या मच्छीमारांना खर्च झालेल्या रकमे इतकीही मासळी हाती लागत नाही.मागील दोन वर्षांपासून कोरोना महामारी आणि नैसर्गिक आपत्तीनंतर मच्छिमारांना मानवनिर्मित अनेक समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. राज्यातील मच्छिमारांना शासनाकडून सवलतीच्या दरात डिझेलचा कोटा दिला जातो.सहा,चार,तीन सिलिंडरच्या मच्छीमार बोटींसाठी वर्षाकाठी शासनाकडून ठराविक डिझेल कोटा देण्यात येतो. मच्छीमार संस्थेमार्फत दिल्या जाणाऱ्या डिझेल कोट्यावर शासनाकडून १० ते १२ टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाते.डिझेलचा संपूर्ण खर्च आधी संस्थेकडून केला जातो.त्यानंतर परताव्याची रक्कम आधी खर्च केलेल्या मच्छिमार संस्थांना अदा केली जाते.

मात्र मागील चार वर्षांपासून ३१ मार्च २०२१ पर्यंत राज्यातील सात जिल्ह्यातील मच्छिमारांची शासनाकडे २२२ कोटी ६९ लाख ४५ हजार ८५४ रुपये डिझेल परताव्याची रक्कम थकीत आहे.यामध्ये पालघर – आठ कोटी ७८ लाख ५९ हजार ५६५,ठाणे– नऊ कोटी ७४ लाख ४६ हजार १०३, मुंबई उपनगर – ५५ कोटी पाच लाख ६० हजार ९७६,मुंबई उपनगर – ५४ कोटी ३८ लाख १२ हजार ८२०, रायगड – ४३ कोटी ४३ लाख ६१ हजार ९९, रत्नागिरी – ४७ कोटी ४३ लाख ६९ हजार १५८, सिंधुदुर्ग – चार कोटी १९ लाख ३६ हजार १३७ या जिल्ह्यातील मच्छिमारांचा समावेश आहे. मच्छीमच्छिमारांना परताव्याची रक्कम चार वर्षांपासून मिळाली नसल्याने मच्छीमारांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.१ जुनपासुन पावसाळी मासेमारी बंदी नंतर १ ऑगस्टपासून मासेमारी हंगामाची पुन्हा सुरूवात होणार आहे.यासाठी मच्छीमारांची आत्तापासूनच लगबग सुरू झाली आहे.मच्छीमार बोटींची डागडूजी, रंगरंगोटी, कामगारांची जमवाजमव करण्यात मच्छिमार गुंतले आहेत.तर मच्छिमार संस्था १ऑगस्टपासून मासेमारी करण्यासाठी निघणाऱ्या मच्छिमार बोटींना डिझेलचा पुरवठा कसा करावा या विवंचनेत आर्थिक तंगीत असलेल्या मच्छिमार संस्था पडल्या आहेत.

करंजा मच्छिमार संस्थेचीही मागील चार वर्षांपासून डिझेल परताव्याची शासनाकडे १४ कोटी ९७ लाख रुपये रक्कम थकीत आहे. परतावे वेळेत मिळत नसल्याने मच्छीमार आणि मत्स्य व्यवसायांवर विपरित परिणाम होत आहे. मासळी व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ येते की काय अशी साधारण भीतीही करंजा मच्छिमार संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कोळी यांनी व्यक्त केली आहे.डिझेल परताव्यापोटी शासनाकडून मिळणारी हक्काची रक्कम वेळेत मिळत नाही. दररोज वाढत्या डिझेल दरवाढीमुळे मच्छिमारांना अधिक गुंतवणूक करावी लागते आहे.

यामुळे मच्छिमारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे वैष्णवी माता सहकारी संस्थेचे अध्यक्ष मार्तंड नाखवा यांनी सांगितले.रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांची डिझेल परताव्याची ४५ कोटी रक्कम थकीत आहे. दोन वर्षातील कोरोनाच्या संकटामुळे परताव्याची रक्कम थकीत राहिली आहे. मच्छिमारांना परताव्याची रक्कम अदा करण्यासाठी अनेकदा बैठकाही झाल्या आहेत. परताव्याची रक्कम अदा करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे मत्स्यव्यवसाय विभागाचे रायगड जिल्हा सहाय्यक आयुक्त सुरेश भारती यांनी माहिती देताना स्पष्ट केले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना महामारीमुळे गेल्या सात महिन्यांपासून मोठे आर्थिक संकट उभे राहिलेले आहे. या परिस्थितीत डोंगर, दऱ्या–खोऱ्यात राहणारा आदिवासी समाज रोजगारापासून सात महिने वंचित राहिला आहे. या आदिवासी कुटुंबाना खावटी अनुदान वाटप विशेष योजनेतंर्गत मदत देण्याचे काम रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदितीताई तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या तळोजेमधील राष्ट्वादी काँग्रेस पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उदघाटन सोहळ्यास उपस्थित राहिल्या असताना सदर कार्यक्रम पार पडला.



या उपक्रमाला उपस्थित राहून गरजू कुटुंबियांना मदत वाटप करण्यात आले, तसेच तळोजा येथील फेज–१ व फेज–२ येथे खासदार सुनिल तटकरे यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन पार पडले. पनवेल शहर सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आरोग्य शिबीर देखील आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉक्टर आणि नर्स या कोरोना योध्दांचा सत्कार रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदितीताई तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी व सामान्य नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी या जनसंपर्क कार्यालयाचा उपयोग होणार असल्याची भावना अदितीतै तटकरे यांनी व्यक्त केली. अनुसूचित जमातीच्या कुटुंबियांना या योजनेंतर्गत चार हजार रुपये प्रती कुटुंब अनुदान देण्यात आले.

यामध्ये २००० रुपयांच्या वस्तू स्वरुपात वाटप आणि २००० इतकी रक्कम बँक / डाक खात्यामध्ये वितरीत करण्यात मान्यता देण्यात आली. उरण तालुक्यातील ९२२ तर पनवेल तालुक्यातील ५ हजार ३६८ नागरिक या योजनेचे लाभार्थी ठरले आहेत. यावेळी पनवेल महानगर पालिका आयुक्त गणेश देशमुख, सहाय्यक प्रकल्प अधिकारी खेडेकर, नायब तहसीलदार मांडे, राष्ट्रवादीचे सरचटणीस प्रशांत पाटील, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस भावनाताई घाणेकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पनवेल अध्यक्ष सतिश पाटील, कार्याध्यक्ष शिवदास काबंळे, सामाजिक न्याय विभागाचे किशोर देवधेकर आदी उपस्थित होते.

### आपला म्हसळा कधी होणार आरोग्य संपन्न

## ग्रामिण रुग्णालयात नाही वैद्यकिय अधिक्षक तर तालुक्याला नाही तालुका आरोग्य अधिकारी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा शहरासह तालुक्यातील ग्रामिण भागामध्ये कोव्हिड १९ चे रुग्ण वाढत आहेत. नव्याने कोव्हिड बाधीत रुग्णांवर शासकीय व्यवस्थेतून मिळणाऱ्या सेवा दर्जेदार मिळत आहेत. तालुक्यात आरोग्य यंत्रणेतून एक ग्रामिण रुग्णालय व म्हसळा, मेंदडी व खामगाव असे ३ जिल्हा परिषद प्रा.आ.केंद्र,पाभरे येथील एक जि. प. दवाखाना यांच्या माध्यमांतून रुग्णांना सेवा दिल्या जात आहेत.

ग्रामिण रुग्णालयात स्थापनेपासून वैद्यकीय अधीक्षक हे पद रिक्त आहे.ग्रामिण रुग्णालय म्हसळयाचा अधीक्षकांचा कारभार श्रीवर्धन मधून केला जात आहे.तर तालुका आरोग्य अधिकाऱ्याचा कारभार जि.प.दवाखाना पाभरे येथील वैद्यकिय आधिकारी पहातात. तालुक्यातीत नागरिकाना दर्जेदार रुग्णसेवा मिळणेसाठी ही दोनही पदे तात्काळ भरणे आवश्यक आहे.

तालुका आरोग्य आधिकाऱ्यांमार्फत तालुक्यातील सर्व प्रा.आ. केंद्र, जि.प. दवाखाना, तालुक्यांतील उपकेंद्र यामार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम, पल्स पोलीओ, आरोग्य सेविकांना प्रशिक्षण देणे, दुर्धर आजार, प्रधानमंत्री मातृवंदन योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रम या विषयी कामकाज इत्यादी बाबत कार्यवाही केली जाते. तालुका आरोग्य व्यवस्थेत तालुका आरोग्य आधिकारी म्हसळा, मेंदडी, खामगाव म्हसळा असे ३ जिल्हा परिषद प्रा.आ.केंद्र, पाभरे येथील एक जि. प. दवाखाना यांच्या माध्यमांतून रुग्णांना सेवा दिल्या जातात. परंतु वैद्यकिय आधिकारी ही पदे सोडून सेवा देणारी कनिष्ठ सहायक, आरोग्य सहाय्यक (पु), आरोग्य सहाय्यक (म), आरोग्य सेवक (पु), आरोग्य



सेवक (म), औषध निर्माता (मिश्रक), शिपाई, स्त्रि परिचर, कुष्ठरोग तंत्रज्ञ अशी तब्बल ३१ पदे रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्या केंद्रांमार्फत तातडीच्याप वैद्यकिय सेवांची उपलब्ध ता, बाहयरुग्णस कक्ष, ६ खाटांचे आंतररुग्ण् कक्ष, शस्त्रमक्रिया सेवा, (कुटुंब कल्याण स्त्री शस्त्राक्रिया) प्रयोगशाळा सेवा पुरविल्या जातात म्हसळा तालुक्यातील तीनही प्राथमिक आरोग्य केंद्रातील ऑपरेशन थिएटर अद्ययावत व दुरुस्ती करणे आवश्यक आहे, तीनही प्राथमिक आरोग्य केंद्रात बेड, गाद्या–उशा, रुग्ण तपासणी टेबल, ख.त. स्टँड, ड्रेसींग ट्रॉली, स्टरलायझेशन मशीन नव्याने पुरविणे आवश्यक आहे.

## पालिका मुख्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांसह जवळपास १०० जणांच्या आरटीपीसीआर चाचण्या

- आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांचीही आरटीपीसीआर चाचणी
- मुख्यालयात येणाऱ्या अभ्यागतांच्या देखील आरटीपीसीआर व अँटीजन चाचण्या करण्यात येणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोविडचा वाढता प्रादुर्भाव कमी करण्याच्या दृष्टिने गेल्या चार – पाच दिवसापासून पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात अँटीजन आणि आरटीपीसीआर टेस्टचे प्रमाण वाढविण्यात आले आहे. आज (बुधवार दि.१४ जुलै) महापालिकेच्या मुख्यालयातील आयुक्त गणेश देशमुख , अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या सह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरटीपीसीआर चाचण्यां करण्यात आल्या.

दिनांक ८ जुलैला आयुक्तांनी घेतलेल्या बैठकीत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात आरटीपीसीआर व अँटीजन चाचण्या वाढविण्याचे आदेश वैद्यकिय आरोग्य विभागाला दिले होते. त्यानुसार उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र चाचण्या केल्या जात आहेत. बुधवारी पालिका मुख्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांसह जवळपास १०० जणांच्या आरटीपीसीआर चाचण्या करण्यात आल्या. यापुढे मुख्यालयात येणाऱ्या अभ्यागतांच्या देखील आरटीपीसीआर व अँटीजन चाचण्या करण्यात येणार आहे.




## कुंभे धबधबा उंच कड्यावरील कचरा उचलुन तरुणांनी केली आदर्शवत कृती

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील कुंभे परिसरात धबधबा पाहण्यासाठी तालुक्यातूनच तसेच बाहेरून अनेक पर्यटक येत असतात. त्यांच्या मार्फत अनावधानाने येथील परिसरात कचरा होत असल्याचे नेहमीच निदर्शनास येत असते, त्याकडे बहुदा दुर्लक्षच केले जाते. शक्यतो धबधबा सोडून येथील कुंभे कड्याचा परिसरात पर्यटक जात नाहीत परंतु तेथेदेखील पोहोचून प्रचंड निसर्ग सौंदर्य असलेल्या परिसराला काही पर्यटकांनी कचरा करून गालबोट लावण्याचा निंदनीय प्रकार केला होता. हे पाहून माणगांवचे वन्यजीव अभ्यासक, छायाचित्रकार शंतनु कुवेसकर व त्यांचे सहकारी मित्र प्रतीक तांबे व चंद्रकांत ठाकर या तरुणांना खंत वाटल्याने इतर कोणाला सांगण्यापेक्षा स्वयंस्फूर्तीने या ठिकाणचा कचरा तात्काळ गोळा करून योग्य ठिकाणी नेहून कचऱ्याची विल्हेवाट लावली.



परमेश्वराने आपल्या दोन्ही हाताने उधळणं करीत कोकणाला अप्रतिम सौंदर्य बहाल केले आहे. त्याचे नुकसान पर्यटनाच्या नावे बेभानपणे मजा करण्याच्या नादात सर्व प्रकारचा प्लास्टिकजन्य कचरा तसेच मद्याच्या काचेच्या बाटल्या व इतर कचरा तरुणाईकडून निष्काळजीपणे टाकून एक प्रकारे निसर्गाला हानीच पोहचत आहे. बरेच जण याबाबत वायफळ भाष्य करीत अशा ठिकाणचे कचऱ्याचे चित्रीकरणही करून सामाजिक माध्यमांवर प्रसारित करत फक्त चर्चा करतात, आता तेवढ्यावरच भागणार नाही. त्यासाठी स्वयंस्फूर्तीने प्रत्यक्ष कृतीतून स्वच्छता करण्याची प्रत्येकाचीच जबाबदारी आहे. याच भावनेतून माणगांवच्या या तरुणांनी जणू काही एक प्रकारे स्वच्छतेचा हा अतिशय सुंदर संदेशच दिला आहे.

## केमस्पेक कंपनीमधील कामगार झाले कायम ; जय भारतीय जनरल कामगार संघटनेची शिष्टाई



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या प्रयत्नातून तळोजा औद्योगिक क्षेत्रातील केमस्पेक केमिकल कंपनीमधील सात कामगारांना कायमस्वरूपी कामगार म्हणून समाविष्ट करून घेण्यात आले आहे.

रोहिदास घरत, सोमनाथ भगत, विशाल पाटील, महेश गोंधळी, राजेंद्र म्हात्रे, शनिवार पाटील, राजेश यादव हे केमस्पेक केमिकल कंपनीमध्ये कॉन्ट्रॅक्ट हेल्पर कामगार म्हणून कार्यरत होते. या कामगारांनी जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे नेतृत्व स्विकारले. त्यानुसार या संघटनेच्या कंपनी व्यवस्थापनासोबत वारंवार चर्चा घडवून या कामगारांना कंपनीच्या सेवेत कायम करून घेतले. त्याचबरोबर त्यांना तब्बल १२ हजार रुपयांची दरमहा पगारवाढ मिळवून दिली. कंपनीकडून त्यांना अधिकृतरीत्या तसे पत्रही त्यांना देण्यात आले आहे. त्याबद्दल कामगारांनी आमदार प्रशांत ठाकूर, संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. यावेळी युनिट अध्यक्ष संतोष घरत उपस्थित होते. कोरोना महामारीमुळे अनेक रोजगार, नोकऱ्यांवर संक्रात आली आहे अशातच जय भारतीय जनरल कामगार संघटनेने केलेल्या शिष्टाईमुळे कामगारांच्या दृष्टिकोनातून एक आदर्शवत पाऊल उचलले गेले आहे.

## शिवसेनेमुळे तब्बल ७९ बंधपत्रित आरोग्य सेवकांना मिळणार १६ वर्षांनी न्याय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यातील ७९ बंधपत्रित आरोग्य सेवकांना तब्बल १६ वर्षांनी शिवसेनेमुळे न्याय मिळणार असल्याने त्यांच्यासह त्यांच्या कुटूंबियांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पनवेल येथील शिवसेना स्थानिक नेते व महाराष्ट्र पर्यटन महामंडळाचे माजी संचालक चंद्रशेखर सोमण यांच्या प्रयत्नांमुळे रायगड मधील आरोग्य सेवकांचा सेवेत कायम होण्याचा मार्ग मोकळा झाला असून तब्बल १६ वर्षांनी या मागणीला यश आले असून या बाबत शिवसेनेने निर्णायक प्रयत्न सुरू केले आहेत. १९९० ते २००२ या कालावधीत महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे कॉंट्रॅक्ट पद्धतीने आरोग्य सेवकांची निवड केली होती.

२००५ मधील न्यायनिर्णयानंतर एका शासन आदेशद्वारे तब्बल १३ जिल्ह्यातील आरोग्य सेवकांना सरकारी सेवेत कायम करून वेतन, बढती सह सर्व लाभ देऊ केले. परंतु रायगड मधील ७९ बंधपत्रित आरोग्य सेवकांचा सेवाखंड क्षमापित करून मूळ नेमणूक दिनांकापासून सेवा नियमित करून सेवाज्येष्ठता, पदोन्नती मधील अन्याय दूर होऊन न्याय मिळावा म्हणून आजपर्यंत अनेक वेळा शासन दरबारी पत्र व्यवहार करूनही न्याय मिळत नव्हता.

या सर्व आरोग्य सेवकांनी बाबत शिवसेना स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण व मा नगर–सेवक प्रथमेश सोमण यांची भेट घेऊन सदर प्रकरणी लक्ष घालण्याची विनंती केली. त्वरित चंद्रशेखर सोमण यांनी आरोग्य विभागाच्या अवर सचिव यांच्याशी चर्चा करून सदर समस्येकडे लक्ष वेधले. त्या वेळी जिल्हा स्तरावरून सदर प्रस्तावच प्राप्त न झाल्याचे कळले. लगेचच सोमण यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी वैशाली पाटील यांच्याशी चर्चा व सतत पाठपुरावा करून अखेरीस हा प्रस्ताव अवघ्या ३ दिवसात तयार करून आज मंत्रालयात मंजुरुसाठी पाठवला आहे. गेली दीड वर्ष हे सर्व आरोग्य अधिकारी कोविड विरुद्धच्या लढ्यात सेवा बजावत असल्याने हा एक मोठा दिलासा शिवसेनेने सदर आरोग्य सेवकांना मिळाला आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेल्या संघर्षाला सकारात्मक मार्ग मिळू लागल्याने संपूर्ण रायगडमधील आरोग्य सेवक समाधानी असल्याचे संस्थेचे अध्यक्ष सोमप्रकाश राऊळ यांनी सांगितले.